Impact Factor-7.675 (SJIF) ISSN-2278-9308


# B.Aadhar

Peer-Reviewed & Refereed Indexed

**Multidisciplinary International Research Journal**

October-2021

## CONSEQUENCES OF BRITISH INVASION OF INDIA : NEED OF REWRITING HISTORY



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor**
Dr Santosh Bansod,
Head , Department of History
Narayanrao Rana Mahavidyalaya
Badnera, Dist. Amravati.

**Editor**
Dr. Dheeraj Kumar Najan,
Head , Department of History
Dr. Gopalrao Khedkar Mahavidyalay
Gadegaon, Telhara Dist. Akola

B.Aadhar

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

ISSUE No- 321

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

**B.Aadhar'** International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor -(SJIF) -7.675,Issue NO, 321 (CCCXXI)
ISSN : 2278-9308
October, 2021

## INDEX-321



| No. | Title of the Paper<br>Authors' Name | Page No. |
|---|---|---|
| 1 | ब्रिटिश आक्रमणाचे वऱ्हाडवरील शैक्षणिक परिणाम प्रा.डॉ. संतोष बनसोड | 1 |
| 2 | ब्रिटिशराजवटीचे भारतावरील परिणाम डॉ.उर्मिला क्षीरसागर | 4 |
| 3 | वॉरन हेस्टिंग्ज कालखंडात भारतात झालेल्या बदलाचा ऐतिहासिक आढावा (इ.स. १७७२ - १७८५) डॉ. शरद गावंडे / पंढरीनाथ पोपट शेजूळ | 8 |
| 4 | वासुदेव बळवंत फडके यांची सशस्त्र चळवळ डॉ श्रीहरी रंगनाथराव पितळे | 11 |
| 5 | भारतावरील ब्रिटीश आक्रमणाचे सांस्कृतिक जीवनावरील परिणाम<br>प्रा. अंभोरे अशोक गंगाराम | 13 |
| 6 | भारतातील ब्रिटीश आक्रमणाचे आर्थिक जीवनावरील परिणाम<br>प्रा.सुरेखा रामदास लगड | 16 |
| 7 | भारतावर ब्रिटिश आक्रमणाचे राजकीय जीवनावर झालेले परिणाम एक ऐतिहासिक चिंतनशील अध्ययन प्रा.डॉ. एन. आर. वर्मा | 18 |
| 8 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारी स्त्रियांचे योगदान<br>प्रा. डॉ. किशोर शेषराव चौरे | 22 |
| 9 | भारतावरील ब्रिटीश आक्रमणाचे शैक्षणिक जीवनावर झालेले परिणाम<br>प्रा. डॉ. शरद गावंडे /प्रा. संजय सदाशिव बनकर | 25 |
| 10 | ब्रिटिश कालीन शिक्षण पद्धतीचे भारतीयांवरील परिणाम<br>डॉ. एस. यु. गावंडे/अमोल विश्वासराव तायडे | 28 |
| 11 | ब्रिटीश कालीन शिक्षणाचे भारतावर झालेले परिणाम<br>डॉ. प्रमोद ना. घ्यार | 31 |
| 12 | ब्रिटीश साम्राज्यवादाविरुद्ध भारतीय राष्ट्रीय आंदोलनाची दीर्घकालीन रणनीती<br>सहा. प्रा. डी.एन. रिठे | 37 |
| 13 | गर्व्हनर जनरल लॉर्ड डलहौसीचे खालसा धोरण एक ऐतिहासिक चिकित्सा १८४८–१८५६ श्रीकांत पांडुरंग तळेकर/डॉ.शरद गावंडे | 40 |
| 14 | बहिरम यात्रा – एक ऐतिहासिक मागोवा कु. शिल्पा युगेंद्र अंबळकार | 44 |
| 15 | भारतीय अर्थव्यवस्था पर ब्रिटिश शासन का प्रभाव... डॉ.सोमनाथ लक्ष्मण गुंजकर | 47 |
| 16 | 'भारतावरील ब्रिटिश आक्रमण, सामाजिक जीवन व भाषांतर युग'<br>डॉ.संदीप अर्जुनराव बनसोडे | 53 |
| 17 | ब्रिटिश आक्रमणाने स्त्री जीवनातील सतिप्रथेवर झालेले परिणाम<br>प्रा. डॉ. कुसमेंद्र गं. सोनटक्के | 56 |
| 18 | भारतावरील ब्रिटीश आक्रमणाचे स्त्री जीवनावरील परिणाम<br>प्रा. कु. सुषमा जयकुमार फरसोले | 58 |

ISSN : 2278-9308
October, 2021

# ब्रिटीश साम्राज्यवादाविरुद्ध भारतीय राष्ट्रीय आंदोलनाची दीर्घकालीन रणनीती

सहा. प्रा. डी.एन. रिठे
इतिहास विभाग ,र.भ. अट्टल महाविद्यालय, गेवराई जि. बीड मो. न. 9420185136

**प्रास्ताविक:**

भारताच्या स्वातंत्र्य लढ्याचा उल्लेख आधुनिक समाजातील सर्वात मोठ्या आंदोलनामध्ये केल्या जातो. विभिन्न प्रकारच्या वर्गाला आणि विचारधारेला या आंदोलनाने राजकीयदृष्ट्या सक्रिय केले व शक्तीशाली साम्राज्यावादी सत्तेस गुडघे टेकण्यास बाध्य केले. भारताचा स्वातंत्र्य लढा लढत असतांना वसाहतवादाच्या विरुध्द एक दिर्घकालीन रणनिती तयार करण्यात आली होती. ही रणनिती राष्ट्रीय आंदोलनातील मवाळ व जहाल यांच्या काळात विकसित झाली. भारतात ब्रिटिश सत्तेची स्थापना ही शक्तीच्या जोरावर स्थापन झाली होती आणि ती बळावरच टिकून होती. परंतू ब्रिटिश सत्तेचा आधार फक्त शक्ती हा नव्हता तर ब्रिटिशांनी काही नागरी संस्थेची स्थापना ही केली होती. निर्वाचीत सदस्य, स्थानिक स्वराज्य संस्था, न्यायालय, शाळा, महाविद्यालय व कायद्याचे शासन स्थापन केले होते. ब्रिटिश सत्तेने अनेक वर्षांच्या मेहनतीने भारतीय जनतेच्या मनात दोन विचारधारा पक्या केल्या होत्या त्या म्हणजे ब्रिटिश सत्ताच भारतीयांची उध्दारकर्ती आहे ती भारताची आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक विकास करीत आहे भारताला आधुनिक बनवत आहे. आणि दुसरी बिटिश सत्ता अपराजीत आहे आणि त्यांना विरोध करने बेकार आहे आणि भारतीय जनता इतकी कमजोर आणि विभाजीत आहे की, ब्रिटिश सत्तेला यशस्वीपणे विरोध करूच शकत नाही. म्हणजे ब्रिटिश सत्ता जेवढ्या प्रमाणात विरोध करण्याची मोकळीक देईल तेवढाच विरोध जनता करु शकत होती. एका सिमेच्या पलीकडे विरोध झाल्यास तो दडपून टाकल्या जात होता. म्हणजे सवैधानिक मर्यादेच्या आत राहूनच संघर्ष केल्या जाऊ शकत होता. भारतीय राष्ट्रीय आंदोलनाने साम्राज्यवादीसत्तेच्या या पैलूंना लक्षात ठेवूनच आपल्या रणनितीचा विकास केला.

**वर्चस्वाचा संघर्ष :**

राष्ट्रीय आंदोलनाचा मुलभूत राजनैतिक मुद्दा हा वर्चस्वासाठीचा दिर्घकालीन संघर्ष हा होता. वसाहतवादी शासनाच्या स्थिरतेचे एक मुख्य कारण म्हणजे ग्रामीण भागातील जनता राजकीयदृष्ट्या निरक्षर होती. त्यासाठी ब्रिटिशानी अत्यंत विचारपूर्वक तशी व्यवस्था तयार केली होती. गांधी युगातील आंदोलनाचे प्रमुख लक्ष्य हे सर्व सामान्य नागरिकांना राजकीयदृष्ट्या सक्रीय करणे हे होते. गांधीजी नेहमी म्हणत असत की जेव्हा लोकामध्ये स्वराज्य घेण्याची ताकत येईल तेव्हात्यांना ते मागताच मिळेल.

राष्ट्रीय आंदोलनाच्या रणनितीचे दुसरे महत्वाचे लक्ष्य होते की जनतेवर वसाहतवादी सत्तेचा जो वैचारिक प्रभाव आहे तो नष्ट करणे कारण ब्रिटिश सत्ता ही फक्त बळावरच नाही तर एका विचारधारेवर टिकून होती. ज्यावर लोक विश्वास करू लागले होते ब्रिटिश सत्ता ही भारतीयांची शुभचिंतक आहे व ती अपराजीत आहे या दोन धारणा नष्ट केल्याशिवाय जन आंदोलन चालविणे कठीण होते. त्यासाठी बौदीक पातळीवर दादाभाई नौरोजी, न्यायमूर्ती रानडे, आर. सी. दत्त यांनी कार्य सुरु केले. व त्यांचे कार्य सामान्य लोकां पर्यंत पोहचविण्याचे काम जहालवादी नेत्यांनी केले.

दुसरी विचारधारा ब्रिटिशसत्ता अपराजीत आहे. याला आव्हान देण्याचे होते. ते कार्य १९ व्या शतकात छापण्यात आलेल्या निर्भिड स्वतंत्र वृत्तपत्रांनी केले. फिरोजशहा मेहता, गोपाळकृष्ण गोक लोकमान्य टिळक, अरविंद घोष व अन्य जहाल नेत्यांनी जनतेला ब्रिटीशांचा खरा शोषक चेहरा दाखविला तसेच जीवनाची पर्वा न करता क्रांतीकारकानी ब्रिटिश सत्ताही अपराजीत नाही हे दाखवून दिले. पण सर्व सामान्य जनतेला निर्भिड आणि साहसी बनविण्याचे काम असहकार व सविनय कायदेभंग या आंदोलनानी केले या आंदोलनाने सामान्य लोकामध्ये संघर्ष आणि त्याग करण्याची क्षमता निर्माण केली व त्यांच्यात विश्वास निर्माण केला की लोकांच्या सहमती शिवाय त्यांच्यावर शासन केले जाऊ शकत नाही.

आंदोलनाच्या रणनितीचे तीसरे लक्ष्य होते ब्रिटिश सत्तेची प्रशासनावरील पकड कमजोर करणे. यासाठी नोकरशाही,पोलिस, सेना यांना राष्ट्रवादेच्या धारेत आणने व त्यांची ब्रिटिश सत्तेबद्दल असलेली निष्ठा व आज्ञाकारीता कमी करणे हे होते. यामध्ये राष्ट्रीय आदोलन बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाले. पुढे पोलिस व जेल अधिकारी यांच्यात

ISSN : 2278-9308
October, 2021

गुणात्मक परिवर्तन घडुन आले. ब्रिटिशाना भारत सोडण्याचा निर्णय यासाठीच घ्यावा लागला कारण इ.स. १९४५ नंतर पोलिस, नोकरशाही यांची ब्रिटिशाप्रती असलेली निष्ठा जवळपास नष्ट झाली होती आणि प्रशासन जवळपास प्रभावहीन बनले होते.

**रचनात्मक कार्य :-**

गांधी युगातील रणनितीमध्ये रचनात्मक कार्याची भूमिका महत्वाची होती. त्याचे मुख्य पैलू खादी,ग्रामोद्योगाचा प्रसार, राष्ट्रीय शिक्षण, हिंदू, मुस्लिम एकता, अस्पृश्यते विरुद्ध संघर्ष आणि त्यांच्या सामाजिक परिस्थिती सुधारणा घडवून आणने, विदेशी कपडे, दारुचा बहिष्कार, यासाठी देशभर आश्रम स्थापन करण्यात आले ते रचनात्मक कार्याचे प्रतिक बनले. संविनय कायदेभंग आंदोलनाच्या माघारीनंतर राजकीय क्षेत्रात निराशा पसरली होती ती करण्यात रचनात्मक कार्याने निर्णायक भूमिका बजावली. ज्यावेळेत आंदोलन सक्रिय नसते तेव्हा कार्यकत्यांना सक्रिय करण्यासाठी त्यांच्यात उत्साह निर्माण करण्यासाठी रचनात्मक कार्य केल्या जात होते याचा एक मोठा फायदा असा होता यामध्ये मोठया प्रमाणात लोकांना सहभागी करून घेता होते. जे लोक रचनात्मक कार्याशी मनापासून जोडल्या गेले. तेच लोक पुढे चालून सविनय कायदेभंगाचे सक्रीय कार्यकर्ते बनले.

**संसदीय प्रक्रिया :-**

ब्रिटिश सत्तेने भारतीय राष्ट्रवादाला आव्हान देण्यासाठी संविधानिक सुधार आणि विधान परिषद यांचा उपयोग केला. ब्रिटिश सत्तेला अशा होती संसदिय प्रक्रिया जन आंदोलनाच्या राष्ट्रवादी स्वरुपाला कमजोर करेल तसेच राष्ट्रीय आंदोलनाच्या कार्यकत्यांमध्ये असंतोष निर्माण करेल संसदेला पाठिबा असणाऱ्या विरुद्ध संसदेला विरोध करणारे अशी त्यांच्यात फुट पडेल पण राष्टवादी नेत्यांनीही संवैधानितक सुधाराच्या तर्कावर आपली रणनिती बनविली. विधान परिषद, नगर पालिका आणि १९३७ च्या निवडनुकीव्दारे स्थापन झालेले सरकार याचा उपयोग अशा प्रकारे केल्या गेला की, त्याव्दारे जनतेच्या प्रश्नाची सोडवणुक करून त्यांचा जास्तीत जास्त लाभ राष्ट्रीय आंदोलनाला होईल तसेच लोकांना स्वशासनाबद्दल विश्वास निर्माण होईल व राष्ट्रीय आंदोलनाची प्रतिष्ठा वाढेल.
ब्रिटिशांनी असा विचार पसरविला होता की, भारतीय जनता राजकीय अधिकारांचा वापर करण्यास योग्य नाही. ती इतकी कमजोर आहे की ब्रिटिश सत्तेस आव्हान देऊ शकत नाही. अशा वेळेस विधान परिषदेमध्ये फिरोजशहा मेहता, गोपाळ कृष्ण गोखले, चित्तरंजनदास, मोतीलाल नेहरु ब्रिटिशाच्या प्रशासनावर आणि त्यांच्या धोरणावर टिका करत होते. तेव्हा भारतीयामध्ये एक प्रकारची उत्तेजना निर्माण होत होती. विधान परिषद संवैधानिक सुधाराप्रती राष्ट्रीय रणनिती बऱ्याच प्रमाणात यशस्वी झाली.

**आहिंसा राष्ट्रीय आंदोलनाचे प्रमुख अंग :-**

गांधीजीने आहिंसेला सिध्दांताच्या स्वरुपात स्विकार केलेले होते आणि ते राष्ट्रीय आंदोलनाच्या रणनितीचे प्रमुख अंग होते. आहिंसात्मक आंदोलनामुळे असे लोक आंदोलनात सहभागी होऊ शकले जे हिंसात्मक संघर्षात सहभागी होऊ शकत नव्हते.

आहिंसेचे सर्वात मोठे महत्व हे होते की, ते आंदोलनाला नैतिक प्राप्त आधार करून देत होते. त्याच अहिंसात्मक आंदोलनाने ब्रिटिशाचा साम्राज्यवादी चेहरा जगासमोर आणला.जे शांतीपुर्ण सत्याग्रहीवर शास्त्राचा वापर करत होते. अहिंसात्मक आंदोलनामुळे ब्रिटिश अधिकाऱ्यापुढेही संभ्रम निर्माण होत होता कारण त्यांनी बळाचा वापर केला तर राष्ट्रवादी म्हणत होते अन्याय होत आहे केले ब्रिटिशांचे कायदे मोडल्या जात होते. परंतु शेवटी कठोर कार्यवाही करुन आंदोलन दडपून टाकत होते.

राष्ट्रीय आंदोलनाला आहिंसेचा मार्ग स्विकारण्या शिवाय पर्यायही नव्हता कारण ब्रिटिशांनी इ.स. १८५८ पासूनच योजनाबद पध्दतीने भारतीयांना निशस्त्र केले होते. याची जाणीव राष्ट्रीय आंदोलनाच्या नेत्यांना सुरुवातीपासुन होती. राष्ट्रीय आंदोलनामध्ये अंहिसेच्या स्विकार करण्यापाठीमागे अजुन एक महत्वाची गोष्ट होती. जर सशस्त्र आंदोलन चालविल्या गेले असते तर ब्रिटीश सत्तेला आंदोलन दडपुन टाकण्याचे कारण मिळाले असते आणि जनता दडपशाहीचा सामना करून शकली नसती. परिणामत: लोकांचा विश्वास कमजोर झाला असता आणि ते राजकीय दृष्टीने कमजोर झाले असते

**दिर्घकालीन रणनितीचे ऐतिहासिक महत्व :-**

भारतीय राष्ट्रीय आंदोलनाने जी रणनीती अवलंबिली विशेषत: गांधीजींच्या नेतृत्वाखाली त्याची तुलना फ्रेंच, रशियन, चीन, व्हिएतनामी, क्रांतीशी केली असता जगाच्या इतिहासात भारतीय राष्ट्रीय आंदोलनाचे महत्वपूर्ण

स्थान दिसून येते.भारत एकमेव देश आहे त्याने वसाहतवादी अर्ध-लोकतांत्रिक राजसत्तेला यशस्वीरीत्या विस्थापित केले.

**निष्कर्ष :-**

भारताच्या स्वातंत्र्य लढ्याचे उदाहरण सर्वात वेगळे दिसून येते ज्यामध्ये राजसत्ता ही क्रांतीकारी आंदोलनाद्वारे एका झटक्यात ताब्यात घेण्यात आली नाही तर राष्ट्रीय आंदोलनाने एका दिर्घकालीन राजकीय लढयाव्दारे आपले लक्ष्य प्राप्त केले हा लढा फक्त राजकीयच नव्हता तर त्याला नैतिक आणि वैचारिक आधार होता. भारतीय राष्ट्रीय आंदोलनाच्या विभिन्न पैलूचा राजकीय रणनितीचा अवलंब करून ज्या देशामध्ये लोकतांत्रिक सरक्षणवादी शासन आहे तेथे या रणनितीचा उपयोग होऊ शकतो किंवा त्या देशांना अशा रणनितीची गरज असे म्हणता येईल.

**संदर्भ सूची :-**

Bipin Chandra, Indian National Movement: The longterm dynamics, New Delhi,1988
B.R. Nanda Gandhi and critics, Delhi 1987
S.Gopal, Jawaharlal Neharu- A Biography, Vol one.
सुनित सरकार, आधुनिक भारत १८८५-१९४७, नवि दिल्ली, १९८४
बी.एल. ग्रोव्हर, एन. के. बेलेकर, आधुनिक भारताचा इतिहास (एक नवीन मुल्यांकन), एच. चंद्र आणि कंपनी, रामनगर, नवी दिल्ली. २००३